## औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद.

दिनांक २९.१०.९६ रोजी झालेल्या मंडळाच्या १०२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत.

### बैठकीस उपस्थित असलेले पदाधिकारी.

| | |
|---|---|
| १. मा. श्री. किशनचंद तनवाणी | सभापती |
| २. श्री. विजय वांगोकर मुख्य अधिकारी औ.मं. | सदस्य |
| ३. श्री. आय.टी. गायकवाड, शहर अभियंता आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांचे | सदस्य प्रतिनिधी. |
| ४. श्री. सु.भू. मिटकरी नगररचनाकार, उपसंचालक नगररचना औरंगाबाद यांचे | सदस्य प्रतिनिधी |
| ५. श्री. सुरेंद्र कुलकर्णी | सदस्य |
| ६. श्री. गणेश माहोरे | सदस्य |
| ७. श्री. अनिल पोलकर | सदस्य |
| ८. श्री. पुंडलीक शिंदे | सदस्य |
| ९. श्री. सुरेश जैन | सदस्य |
| १०. श्री. अशोक लोंबटे | सदस्य |
| ११. श्रीमती कमल तुल्ले | सदस्या |
| १२. श्रीमती उषाताई साने | सदस्या |
| १३. श्री. सुजित ठाकुर | सदस्य |
| १४. श्री. आसाराम तळेकर | सदस्य |
| १५. श्री. कैलास सेठी | सदस्य |
| १६. श्री. नंदु कुलकर्णी | सदस्य |

वंदेमातरमनंतर, महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माणमंत्री व औरंगाबाद जिल्हयाचे पालकमंत्री मा.ना.श्री.चंद्रकांतजी खैरे यांच्या वडीलांचे, तसेच मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री.पुंडलीकराव शिंदे यांच्या वडीलांचे व सन्माननीय सदस्य श्री.सुरेंद्र कुलकर्णी यांच्या आईचे, दुःखाद निधन झाल्यामुळे मंडळातर्फे श्रध्दांजली वाहण्यात आली.

यानंतर मंडळाचे मुख्याधिकारी श्री.वांगोकर यांनी मंडळाचे उपस्थित सन्माननीय पदाधिकाऱ्यांना आपला परिचय करुन दिला व उपस्थितांचे स्वागत केले व सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली.

यानंतर मंडळाचे सदस्य प्रा.श्री.नंदु कुलकर्णी यांनी मा.सभापती श्री.किशनचंद तनवाणी व सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून दिले की, मंडळाची कोठा नांदेड येथे होणारी नियोजित वसाहतीस शामाप्रसाद मुखर्जी नगर असे नांव देण्याचा निर्णय मंडळाच्या बैठकीत यापुर्वीच घेण्यात आला होता. परंतु कोठा नांदेड येथील निविदा प्रसिध्दीची जाहिरात देतांना शामा प्रसाद मुखार्जी या नांवाचा उल्लेख केलेला नाही.

व जाहिरातीची प्रतही यापुर्वी ठरवुनही सदस्यांना मिळालेली नाही. त्यांनी याबाबत खेद व्यक्त केला. या अनुषंगाने मा. श्री. तनवाणी सभापती औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, या जाहिरातीबाबत माझ्याशी चर्चा केली नाही किंवा त्याची कल्पना दिलेली नाही ही पध्दत बरोबर नाही व ज्या दिवशी वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीसाठी दिली जाते त्याच दिवशी प्रत सभापतींना पाठविली जाते हे योग्य नाही. जाहिरात देण्यापुर्वी किमान १० दिवस अगोदर सन्माननीय सदस्यांना त्याची प्रत मिळाली पाहिजे असे यापुर्वीच ठरलेले असतांना त्याची अंमलबजावणी होत नाही याची सदस्यांनी खंत व्यक्त केली. यावर मुख्य अधिकारी औ. मं. यांनी जाहिरातीची प्रत सन्माननीय सदस्यांना न दिल्याबद्दल दिलगीरी व्यक्त करुन जाहिरातीची प्रत सदस्यांना देण्याच्या सुचना दिल्यात, संबंधीत अधिकाऱ्यांनी मंडळाच्या ठरलेल्या निर्णयाप्रमाणे कार्यवाही करावी.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, कौठा नांदेड येथील नियोजीत वसाहतीस महापुरुषाचे नांव देण्याचा निर्णय घेतलेला असतांना त्याप्रमाणे जाहिरात प्रसिध्द का केली नाही असे विचारले.

त्यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, निविदा प्रसिध्द करतांना प्रशासकीय मान्यतेनुसार जमिनीचा गट नंबर/सर्व्हे नंबरसह देण्यांत येते.

यावर मा. सभापतींनीच सुचना केली की, निविदेची मुदत असेल तर शामा प्रसाद मुखर्जी असे नांव देऊन शुध्दीपत्रक प्रसिध्द करावे.

यानंतर सदस्यांनी प्रतिपादन केले की, मंडळातर्फे प्रसिध्द करण्यांत येणाऱ्या जाहिरातीची प्रत सर्व सन्माननीय सदस्यांना वर्तमानपत्रात प्रसिध्द होण्यापुर्वी किमान १० दिवस अगोदर मिळतील याची काळजी घ्यावी.

मंडळाचे सदस्य श्री. आसारामजी तळेकर यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, औरंगाबाद शहर हे दिवसेंदिवस वाढत आहे. औद्योगिकरणामुळे लोकांची संख्या वाढत आहे. म्हाडाचे घर हे, सिडको व खाजगी बिल्डरपेक्षा महाग आहे.

यावर चर्चा करतांना श्री. सुरेश जैन सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, म्हाडाचे चार्जेस जास्त असतात.

चर्चेच्या ओघात मंडळाचे सदस्य श्री. गणेश माहोरे यांनी प्रतिपादन केले की, घरांच्या किंमती का वाढतात व त्यास कारणीभुत कोण ?

यावर मा. मुख्य अधिकारी श्री. वांगीकर यांनी प्रतिपादन केले की, म्हाडाची नुकतीच पुणे येथे बैठक झालेली आहे व या बैठकीत हा विषय होता. त्या बैठकीत गाळ्यांची/भूखंडाची किंमती ह्या जाहीर केलेल्या किंमतीत १०% पेक्षा अधिक वाढू नये यासाठी प्रयत्न करण्यांत यावेत असा क्रांतीकारी निर्णय म्हाडाने घेतलेला आहे. तसेच जाहीर केलेल्या किंमतीमध्ये कालांतराने साहित्याच्या किंमतीत झालेल्या वाढीमुळे तसेच म. रा. वि. मं. कडून वीज पुरवठ्यासाठी जास्त आकारणी झाल्यामुळे गाळ्यांच्या किंमती वाढतात. तसेच रिकामे असलेल्या गाळ्याच्या मुळ किंमतीमध्ये व्याजाचे भांडवलीकरणाच्या रकमेचा समावेश करुन किंमत निश्चीत केली जाते. त्यामुळे गाळ्याच्या किंमती वाढतात. त्यासाठी मुळ किंमतीनुसार आय. डी. पी. घेऊन व्याजाच्या रक्कमेची हप्ते पाडून दिल्यास व गाळे वाटपासाठी आकर्षित अशी जाहिरात जास्त सरक्युलेशन असणाऱ्या दैनिकात प्रसिध्द करावी असे मा. सभापती

यांनी प्रतिपादन केले व रिकामे गाळे त्वरीत वाटपाचे दृष्टीने काही कालावधीनंतर किंमतीमध्ये वाढ न करता किंमत गोठविण्याचा प्रस्ताव केला पाहिजे असे प्रतिपादन केले.

यापुढे प्रतिपादन करतांना मा.मु.अ/औ.मं यांनी मंडळास सांगितले की, २% शासन स्वेच्छानिर्णयानुसार व २०% मागासवर्गीयासाठी असलेले गाळे हे रिक्त ठेवणे आवश्यक आहे व मागासवर्गीयासाठी असलेल्या गाळ्याच्या वाटपासाठी समाज कल्याण खात्याला पत्र पाठविलेले आहे व रिक्त गाळ्याची माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना देण्याच्या सुचना मा.मु.अ. यांनी केली व त्याप्रमाणे रिक्त गाळ्याची माहिती सर्व सदस्यांना देण्यात आली.

मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, मुकूंदवाडी येथील जमिनीवरील योजनेस सिडकोकडून मान्यता मिळाल्यास व तिसगांव येथील स्टोन क्रशर्स उठल्यानंतर, तसेच शहानुरवाडी येथील नविन जमिन मंडळाला मिळणार आहे व त्यामुळे औरंगाबाद शहरात किमान ३००० घराचा कार्यक्रम मंडळाच्या हाती घेता येईल.

यावर मंडळाचे सदस्य श्री. तळेकर व इतर सदस्यांनी विचारले की, तीसगांव येथील स्टोन क्रशर्स हटविण्याबाबत व मुकूंदवाडी येथील योजनेच्या मान्यतेबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा.

~~यावर मुख्य अधिकारी यांनी~~ खुलासा केला की, या संबंधी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना पत्र पाठविले आहे व प्रत्यक्षात भेट देखील घेतली आहे.

या अनुषंगाने मा. सभापती श्री. तनवाणी यांनी प्रतिपादन केले की, मुकूंदवाडी व तीसगांवच्या प्रश्नासाठी मा. पालकमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक दि. ३०. १०. ९६ ला आयोजित केली आहे. सिडको प्रशासन, जिल्हाधिकारी, स्टोन क्रशर्सवाले हे ही या बैठकीस उपस्थित राहतील.

मा. सभापती श्री. तनवाणी यांनी मंडळा अंतर्गत असलेल्या नविन योजनांना प्रशासकीय मान्यता प्राधिकरणाकडून केंव्हा मिळाली याची विचारणा केली.

यावर कार्यकारी अभियंता औरंगाबाद मंडळ यांनी खुलासा केला की, गृहनिर्माण भवनाजवळील ४८ मध्यम उ. गटाच्या योजनेस ४० गाळ्याचीच प्रशासकीय मान्यता दि. ३०. ७. ९६ ला मिळाली.

२] नांदेड कौठा येथील फक्त ६० अल्प उ. गट गाळ्यासाठी प्रशासकीय मान्यता दि. १९. ७. ९६ ला मिळाली.

३] परभणी येथील फक्त २५ अल्प उ. गट दि. ३०. ७. ९६ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली.

४] देवगिरी येथील म.उ.गटाच्या १६ गाळे या योजनेस प्रशासकीय मान्यता दिनांक ३०.७.९६ रोजी मिळाली.

यावर मा. सभापती यांनी विचारले की, प्रशासकीय मान्यता मिळून दोन महिण्याचा कालावधी झालेला असुन अद्यापपर्यन्त निविदा का काढल्या नाहीत ?

यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, तांत्रिक मान्यता देण्यासाठी व आर.सी.सी.कन्सलटंट यांच्याशी चर्चा करून तांत्रिक मान्यता देण्यास कालावधी लागतो. त्यामुळे निविदा प्रसिद्ध करता आलेली नाही.

मा.सभापतींनी परभणी येथील निविदा प्रसिध्द केली आहे का ? यावर खुलासा करण्यांत आला की, न.प. निवडणुकीच्या आचारसंहीतेमुळे परभणी येथील निविदा सुचना प्रसिध्द करण्यांत आलेली नाही.

मंडळाच्या सदस्या श्रीमती तुल्ले यांनी जालना येथील विडी कामगार योजनेच्या पाणीपुरवठा, गाळयांचे दरवाजे, खिडक्याच्या नादुरूस्तीबाबत विचारणा केली.

यावर खुलासा करण्यांत आला की, विडी कामगार योजनेच्या पाणीपुरवठयासाठी लाईन टाकण्याकरिता परिसर अभियांत्रिकी विभाग यांचेकडे रू.१४ लाख भरलेले आहे व ठेकेदाराने काम सुरू केले होते. परंतु ठेकेदाराने मध्येच काम बंद केले आहे.

यावर मा.सभापती यांनी सांगितले की, पाणीपुरवठयाच्या लाईनचे काम लवकरच पुर्ण होईल व विडी कामगाराच्या वसाहतीला लवकरच पाणी मिळेल. परंतु गाळयाच्या नादुरूस्तीबाबत केंव्हा कार्यवाही करणार याबाबत विचारणा केली.

यावर कार्यकारी अभियंता यांनी खुलासा केला की, पाणीपुरवठा उपलब्ध झाल्यानंतर व विडी कामगार लाभधारकांना गाळा ताब्यात देण्या अगोदर विशेष दुरूस्तीचे अंदाजपत्रकाप्रमाणे गाळयाची दुरूस्ती करून देण्यांत येईल.

सदस्या श्रीमती तुल्ले यांनी सांगितले की, आमदार निधीतुन म्हाडा वसाहतीसाठी रू. ५.०० लाख मा.आ.श्री.अर्जुन खोतकर यांनी दिल्याचे समजते त्याचे काम कधी सुरू होणार याबाबत विचारणा केली.

यावर खुलासा करण्यांत आला की, आमदार निधीतुन मिळणा-या पैशातुन भोकरदनरोड या वसाहतीतील रोड व गटारचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करून जिल्हाधिकारी जालना यांचाकडे मंजूरीसाठी पाठविले आहे. मंजूर झाल्यानंतर कामास सुरूवात करण्यांत येईल. या अनुषंगाने मा.मु.अ/

यांनी सुचना केली की, काम सुरु करण्यापुर्वी मा. आमदार महोदयांचा वेळ घेऊन कामास रितसर सुरुवात करावी.

तसेच श्रीमती तुल्ले यांनी जालना येथील मंडळाच्या वसाहतीत व जमिनीवर मंडळाचा फलक लावण्यांत यावा अशी सुचना केली.

यावर मा. सभापतीमहोदयांनी संबंधीत अधिकाऱ्यांना सूचना दिल्यात की, मंडळाच्या अखत्यारीतील वसाहतीत व जमिनीवर मंडळाचा फलक लावण्यांत यावेत.

मंडळाचे सदस्य श्री. सुजीत ठाकुर यांनी विचारणा केली की, यापुर्वीच्या मंडळाच्या बैठकीत मंडळाच्या वसाहतीतील अनाधिकृत बांधकामे/अतिक्रमणे काढण्यासाठी अतिक्रमण पथक निर्माण करण्यांत आले होते. त्याबाबत आजपर्यन्त काय कार्यवाही झाली त्याबाबतची माहिती सभागृहाला द्यावी.

या अनुषंगाने मंडळाचे सभापती मा. श्री. तनवाणी यांनी मिळकत व्यवस्थापक यांना वसाहतीतील अतिक्रमणाबाबत काय कार्यवाही केली याची मंडळास माहिती द्यावी असे सांगितले.

यावर मिळकत व्यवस्थापक यांनी खुलासा केला की,, ज्या गाळेधारकांनी अतिक्रमण करून बांधकाम केले आहे त्यांच्याविरूध्द कारणे दाखवा नोटीस बजावण्यांत येऊन सक्षम प्राधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविल्या आहेत. तसेच साईनगर येथील अतिक्रमण काढण्यासाठी संबंधीतास नोटीस दिलेली आहे व सदर अतिक्रमण काढून टाकण्यासाठी पोलीसांची मदत मागितली होती परंतु अद्याप पोलीस मदत मिळालेली नाही.

मा. सभापती श्री. तनवाणी यांनी सांगितले की, मंडळाच्या वसाहतीत भाडेवसुलीकार/बीलकलेक्टर वसुलीसाठी जातात व त्या वसाहतीत होणाऱ्या अतिक्रमणाबाबतची जबाबदारी त्या त्या वसाहतीतील भाडेवसुलीकारावर सोपविलेली असतांना आतापर्यन्त अनाधिकृत बांधकामाबाबत किती भाडेवसुलीकारांनी अहवाल दिला आहे व आजही वसाहतीत बांधकाम चालु आहे.

मा. सभापतींनी सांगितले की, स्थानिक दैनिकात म्हाडाच्या निवासी गाळ्यांचा वापर हा अनिवासी वापरासाठी करण्यांत येतो अशा प्रकारची बातमी प्रसिध्द होईपर्यन्त म्हाडाकडून काही कार्यवाही केली जात नाही याबाब खेद व्यक्त करून संबधीतावर त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी असे सुचीत केले.

यावर मिळकत व्यवस्थापक यांनी खुलासा केला की, बळीराम पाटील विद्यालयाजवळील वसाहतीत ज्या गाळेधारकांनी निवासी गाळ्यांचा वापर अनिवासी वापरासाठी केला आहे. त्यांच्या विरुध्द म्हाडा अधिनियम कलम ६६ अनुसार कार्यवाही करण्यासाठी नोटीसा तयार करून सक्षम प्राधिकारी यांचेकडे पाठविण्यात येत आहे.

मा. सभापती श्री. तनवाणी यांनी मि. व्य. यांचेकडे विचारणा केली की, सक्षम प्राधिकारी यांचेकडे किती प्रकरणे पाठविली आहे व किती प्रकरणात निकाल लागला आहे व किती प्रलंबीत आहे.

यावर मि. व्य. यांनी खुलासा केला की, सक्षम प्राधिकारी यांचेकडे ४६१ प्रकरणे पाठविली होती. त्यापैकी १४६ प्रकरणात गाळेधारकांना गाळ्यातुन काढून टाकण्याचे आदेश दिले आहेत. १४६ निष्कासन प्रकरणापैकी २९ वारंट ऑफ पझेशनचे प्रकरण सक्षम प्राधिकारी यांच्याकडून जुलै ९६ मध्ये प्राप्त झाले आहे. .३१५ प्रकरण अद्याप सक्षम अधिकारी यांचेकडे प्रलंबीत आहेत.

यावर मा. सभापती यांनी विचारले की, गाळेधारकांना गाळ्यातुन काढून टाकण्याचे आदेश कधी प्राप्त झाले व त्याप्रमाणे कार्यवाही केली का व अद्याप एकही गाळा रिकामा करून घेतल्याचे दिसत नाही.

यावर मिळकत व्यवस्थापक यांनी खुलासा केला की, २९ प्रकरणात दिनांक जुलै ९६ मध्ये गाळेधारकांना गाळ्यातुन निष्कासीत करण्याचे आदेश प्राप्त झाले आहे. परंतु पावसाळ्यामुळे निष्कासनाची कार्यवाही करता आलेली नाही. यावर मा. मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, म्हाडाच्या स्थावर मालमत्तेचे रक्षण करणे हे मंडळाच्या अधिका-यांचे कर्तव्य आहे व अधिका-यांनी आपआपले कर्तव्य व्यवस्थीरित्या पार पाडावे.

मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, गाळेधारकांनी त्यांच्या गाळ्याशेजारील मोकळ्या जागेवर/गाळ्यालगत असलेल्या जमिनीवर अतिक्रमण करून बांधकाम केले आहे त्यांना नोटीसा देऊन बांधकाम काढून टाकण्याचे कळविण्यात यावे असे ठरले होते. त्याप्रमाणे किती लोकांना नोटीसा दिल्या व किती लोक अनाधिकृत बांधकाम नियमित करून घेण्यासाठी मंडळाकडे आले याचा खुलासा सभागृहास करावे असे सदस्यांनी प्रतिपादन केले.

यावर मंडळाच्या मिळकत व्यवस्थापक यांनी खुलासा केला की, गाळ्यालगतच्या जागेवर अतिक्रमण करणा-या गाळेधारकांना नोटीसा पाठविल्यात त्यापैकी ३ गाळेधारक जागेची किंमत भरण्यासाठी तयार आहेत.

मा. सभापतींनी प्रतिपादन केले की, ज्या लोकांनी गाळ्यालगतच्या जागेवर अनाधिकृत बांधकाम केलेले आहे अशा लोकांनी पैसे भरण्याची तयारी दर्शविनही त्यांना अद्याप पैसे भरण्याचे कळविले नाही.

जमिनीची विक्री किंमत काढून मिळण्यासाठी प्रस्ताव कार्यकारी अभियंता यांचेकडे पाठविले आहे असे मि. व्य. यांनी खुलासा केला.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. आत्माराम तळेकर यांनी एन-५ मधील धर्मवीर संभाजी विद्यालयाच्या बाजुची जमिन म्हाडाची असल्याचे सिडको सांगते व म्हाडाचे अधिकारी म्हणतात सदर जागा म्हाडाची नाही याबाबत खुलासा करावा.

मा. सभापती व मुख्य अधिकारी यांनी कार्यकारी अभियंता यांना याबाबत विचारणा केली, यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, जमिन म्हाडाची नाही.

चर्चेत भाग घेतांना मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी प्रतिपादन केले की, अशाच प्रकारचा प्रश्न लातुर येथील एम. आय. डी. सी. वसाहतीत निर्माण झाला होता. रोडच्या बाजुला ३० फुट जागा होती. त्यावर अतिक्रमण सुरु झालेले होते. एम. आय. डी. सी. कडे याबाबत कळविले असता एम. आय. डी. सी. ने सांगितले की, ही जमिन म्हाडाची व ती नोमॅन्स लॅन्ड म्हणून सोडलेली आहे. अशाच प्रकारची जमिन एन-५ सिडको औरंगाबाद येथील असेल त्याची चौकशी/खातरजमा करावी.

यावर मा. सभापतींनी कार्यकारी अभियंता यांना सुचना केली की, याबाबत योग्य ती चौकशी करावी व त्याचा अहवाल तात्काळ द्यावा. यावर कार्यकारी अभियंता यांनी सांगितले की, चौकशी करुन अहवाल सादर करतो.

मंडळाचे सदस्य प्रा. चंद्र कुलकर्णी यांनी सांगितले की, मा. गृहनिर्माणमंत्री हे नांदेड दौ-यावर आले असता वसाहतीतील अनाधिकृत बांधकाम/अतिक्रमणे याबाबत निवेदन देण्यांत आले होते. त्यावर त्यांनी सांगितले की, अतिक्रमण काढण्यासाठी पथक निर्माण करण्याचा प्रस्ताव पाठवावा म्हणजे त्यास मान्यता देण्यांत येईल.

चर्चेच्या ओघात प्रा. श्री. कुलकर्णी यांनी सांगितले की, स्थानिक न. प. च्या सहकार्याने जिल्हानिहाय अतिक्रमण काढण्याचा प्रयत्न करावा व मंडळाच्या [ना हरकत प्रमाणपत्र] एन. ओ. सी. शिवाय बांधकाम परवानगी देऊ नये असे न. प. कळविण्यांत यावे.

मंडळाच्या सदस्या श्रीमती तुल्ले यांनी मंडळाच्या निदर्शनास आणून दिले की, जालना येथील श्री. वाघमारे व खरात यांची जमिन घेऊन बरोच वर्षे झाले आहेत परंतु त्यांना अद्यापपर्यन्त जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट होत चाललेली आहे.

यावर मंडळाच्या सदस्या श्रीमती साने व श्री. तळेकर सदस्य यांनी प्रतिपादन केले की, जमिन मंडळाने ताब्यात घेऊन योजना राबवुन जमिनीची किंमत जमिन मालकास न देणे हे योग्य नाही.

यावर खुलासा करण्यांत आला की, म्हाडा कलम ४१ अनुसार जालना येथील जमिन संपादीत करण्यांत आली आहे व त्यानुसार सदर जमिनीची किंमत जिल्हाधिकारी यांनी निश्चित करावयाची आहे. त्यासाठी जिल्हाधिकारी यांचेकडे पाठपुरावा करण्यांत येत आहे व त्यासाठी ऑगस्ट ९६ व सप्टेंबर ९६ मध्ये जिल्हाधिकारी यांचेकडे बैठका झाल्यात. सप्टेंबर ९६ च्या बैठकीत जिल्हाधिकारी यांचेकडे जमिन मालक हजर नव्हते. जमिनीची अंतिम किंमत निश्चित न झाल्यामुळे जमिन मालकास जमिनीची किंमत अदा करता आलेली नाही.

यावर मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, विभागीय आयुक्त हे मंडळाचे सदस्य आहेत. त्यांना उक्त बाबीची कल्पना विशद करुन मा. सभापतीच्या स्वाक्षरीने एक पत्र पाठवावे व या प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्यासाठी वैयक्तीक लक्ष घालण्याची विनंती करावी.

मंडळाचे मा. सभापती व सन्माननीय सदस्यांनी वसाहतीतील अनाधिकृत बांधकामाबाबत चिंता व्यक्त केली आहे. अतिक्रमण थांबविण्यासाठी मंडळाने अतिक्रमण हटाव पथक निर्माण करुनही काहीच कार्यवाही अधिकाऱ्यांकडून होत नसल्यामुळे तीव्र नाराजी व्यक्त केली व भविष्यात अतिक्रमण हटाव पथकाने व अधिकाऱ्यांनी जागरूकतेने काम करावे अशी अपेक्षा मंडळाने व्यक्त केली.

मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. सुजीत ठाकूर यांनी विचारणा केली की, मंडळाच्या थकबाकीदाराकडून वसूल करावयाचा सरचार्ज भाडेवसुलीकारांनी कमी जास्त वसुल केल्याचे आढळून आले होते. त्यावर एक समिती नेमली होती. त्या समितीचा अहवाल सभागृहासमोर सादर करावा.

या अनुषंगाने मा. सभापती श्री. तनवाणी यांनी मिळकत व्यवस्थापक यांना विचारले की, सरचार्जबाबत काय कार्यवाही केली.

मिळकत व्यवस्थापक यांनी सांगितले की, तीन महिण्याच्या नंतर थकीत हप्त्यावर सरचार्ज न लावणेबाबतचा प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविला आहे व सरचार्जबाबत संबंधीत भाडेवसुलीकार यांना ज्ञापन देऊन खुलासा मागविला होता. भाडेवसुलीकारांकडून प्राप्त झालेले खुलासे मंडळास वाचुन

दाखविण्यांत यावे असे मा. सभापतीमहोदयांनी सांगितले.

मिळकत व्यवस्थापक यांनी भाडेवसुलीकाराचे प्राप्त झालेले खुलासे मंडळास वाचुन दाखविले. सदर खुलासे असमाधानकारक असल्याचे मंडळाचे मत झाले आहे. प्राधिकरणाने सरचार्जच्या बाबतीत काढलेल्या परिपत्रकाबाबत खुलासा मागविला असल्याचे मिळकत व्यवस्थापक यांनी मंडळास सांगितले.

सन १९९३ मध्ये निघालेल्या प्राधिकरणाच्या परिपत्रकाबाबत सन १९९६ मध्ये खुलासा मागविला आहे यावर मा. सभापतीमहोदयांनी खेद व्यक्त केला.

भाडेवसुलीकारांनी थकबाकीदारांकडून कधी २०% नी व १० टक्क्यांनी सरचार्ज घेतला किंवा थकबाकीदारांकडून सरचार्ज वसुल केलाच नाही व सरचार्ज न घेतल्याने" सरचार्ज दिला नाही" " Not paid " असा उल्लेख ज्ञापनामध्ये मेमोच्या खुलाश्यात केला आहे असे त्यांना करता येते का ? काही भाडेवसुली--कारांनी प्राधिकरणाचे परिपत्रक माहिती नव्हते, वरिष्ठांच्या आदेशानुसार काम केले आहे असे म्हटले आहे ही बाब अत्यंत गंभीर आहे व दोषी विरुध्द योग्य ती कार्यवाही त्वरीत करावी असे सुजीत ठाकूर यांनी प्रतिपादन केले यास श्री. तळेकर सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी अनुमोदन दिले.

यावर मा. सभापतीमहोदयांनी प्रतिपादन केले की, मंडळाच्या ८२ वसाहती पैकी ५ वसाहतीचे तपासणी अंती सरचार्ज पोटी रु. ३ लाख बाकी आहे. ज्यांच्याकडून सरचार्जपोटी जास्तीची रक्कम घेतली आहे ती संबंधीतांना परत करावी किंवा हप्त्यात वळती करावी व जेवढा सरचार्ज बाकी आहे तो भाडेवसुलीकारांकडून वसुलकरावा. सरचार्ज वसुलीच्या बाबतीत कमी /जास्त घेणे अथवा न घेणे याबाबत सर्वस्वी भाडेवसुलीकार जबाबदार आहे. त्यांचेवर कार्यवाही करावी व त्याचा अहवाल तीन दिवसाच्या आत सन्माननीय सदस्यांना द्यावा असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी प्रतिपादन केले की, सरचार्ज आकारतांना, भाडेतत्वावर, एकरकमी खरेदी पध्दती, हुडकोच्या कर्जावरील योजना, म्हाडा फंड किंवा अन्य फंडातुन घेतलेल्या योजना याची पाहणी करुनच नंतरच सरचार्ज लावावयाचा आहे. प्राधिकरणाच्या परिपत्रकाचा अभ्यास करुन सर्व भाडेवसुलीकारां--नी सर्व लाभार्थींना एकच न्याय द्यावा. ज्याला जसे वाटेल तसे सरचार्ज घेतला हे योग्य नाही.

मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, हे प्रकरण गंभीर असल्याने प्राधिकरणाकडे पाठवावे.

यास श्री. सुजीत ठाकूर सदस्य औ. मं. यांनी प्रतिपादन केले की, सरचार्ज बाबतचे प्रकरण प्राधिकरणाकडे न पाठविता मुख्य अधिकारी यांनी कार्यवाही करावी.

यावर सखोल चर्चा होऊन मा. सभापतींनी सर्व सन्माननीय सदस्यांच्या सम्मतीने असा निर्णय दिला की, सरचार्जच्या बाबतीत मुख्य अधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही १५ दिवसाच्या आत करावी. १५ दिवसाच्या आत कार्यवाही न झाल्यास हे प्रकरण प्राधिकरणाच्या दक्षता विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी सोपवावे.

सेक्युरिटी सर्व्हीसेसच्या अनुषंगाने मंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला व त्यातच कंत्राटी पध्दतीवर एकत्रीत वेतनावर काम करित असलेल्या लोकांमधून ज्येष्ठतेनुसार मंडळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने वॉचमन म्हणून नेमण्याचा प्रस्ताव मंडळाने प्राधिकरणास पाठविण्याचा निर्णय घेतला होता. त्यासंबंधी काय झाले असे मंडळाचे सदस्य श्री. सुजीत ठाकुर यांनी विचारले.

यावर मुख्य लेखा अधिकारी यांनी खुलासा केला की, सेक्युरिटी सर्व्हीससाठी निविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविल्या आहेत. विहित -- कालावधीत २ निविदा विकल्या गेल्यात व एक मोहरबंद निविदा मे. मेडिपर्टस अजिंठा सेक्युरिटी प्रा. लि. यांची निविदा प्राप्त झाली आहे व ती मंडळाच्या मान्यतेसाठी सादर केलेली आहे.

मा. सभापतींनी प्राधिकरणाकडे पाठविलेल्या पत्राचे निरक्षण केले असता असे आढळुन आले की, एका अपंग महिलाचे नांव मंडळाच्या सुरक्षततेसाठी नेमावयाच्या वॉचमनसाठी पाठविलेले आहे हे योग्य नाही असे प्रतिपादन केले. मंडळाच्या ठरावाची पार्श्वभूमी लक्षात न घेता प्रस्ताव प्राधिकरणाकडे पाठविला आहे. याबाबत सदस्यांनी नाराजी व्यक्त केली. जे लोक रु. ५००/- मोबदल्यावर काम करतात, त्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देण्यांत यावे असे सन्माननीय सदस्यांनी व सभापतीमहोदयांनी सांगितले.

औरंगाबाद मंडळाकरिता न्यायालयीन प्रकरणाकरिता वकीलाचे पॅनल नेमण्याबाबत निर्णय घेतला होता. त्याविषयी सन्माननीय सदस्यांनी विचारणा केली. यावर खुलासा करण्यांत आला की, मंडळाच्या नियमाप्रमाणे वर्तमानपत्रात दि. २.८.९६ रोजी जाहिरात देऊन मंडळाच्या पॅनलवर वकील नेमण्यासाठी अर्ज मागविले त्याची मुदत ५.९.९६ पर्यन्त होती परंतु पुरेसे अर्ज प्राप्त न झाल्याने अर्ज स्वीकृतीसाठी दि. २०.९.९६ पर्यन्त मुदत वाढ

देण्यांत आली या कालावधीत खालील प्रमाणे एकुण २२ अर्ज प्राप्त झाले आहेत.

औरंगाबाद १५, जालना १, परभणी १, नांदेड ३, लातूर२,

सदर अर्ज प्राधिकरणाकडे पाठविले. उस्मानाबाद, बीड साठी अर्ज न आल्याने तेथील स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात दिली आहे. त्याची मुदत २५. ११. ९६ पर्यन्त आहे.

मंडळाचे सदस्य श्री. सुजीत ठाकुर यांनी प्रतिपादन केले की, मागच्या बैठकीत जमिन पाहण्यासाठी समिती गठीत करण्यांत आली आहे. सदर समितीने उस्मानाबाद व भूम येथील जमिनीची पाहणी करावी व म्हाडाने योग्य किंमत दिल्यास तेथील जमिन मालकांनी जमिन देण्यासाठी संमती दिलेली आहे. करिता समितीच्या व मंडळाच्या सदस्यांनी उस्मानाबाद व भूम येथील जमिन पाहण्यासाठी यावे अशी विनंती श्री. ठाकूर यांनी केली आहे.

मंडळाच्या सन्माननीय सदस्यांनी प्रतिपादन केले की, प्राधिकरणाकडे प्रलंबीत असलेल्या प्रकरणाचा पाठपुरावा करण्यासाठी समिती गठीत करण्यांत आली होती. त्या समितीने काय कार्यवाही केली याची माहिती द्यावी. मा. सभापतींनी मंडळास माहिती दिली की, प्राधिकरणाकडे प्रलंबीत असलेले गृहनिर्माण योजनेच्या प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव प्राधिकरणाकडून मंजूर करुन घेतले.

मंडळाच्या १०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यांत आला की,

ठराव क्र. ६१५

मंडळाच्या दिनांक ९. ७. ९६ रोजी झालेल्या १०१ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांवर चर्चा होऊन झालेल्या चर्चावर कार्यवाही करण्याचा निर्णय घेऊन १०१ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्यांत आला.

विषय क्र. २: मंडळाच्या कार्यालयीन इमारतीच्या रक्षणासाठी सेक्युरिटी सर्व्हीसेस संस्थेकडून निविदा मागविण्याबाबत.

.....

वरील विषयाची माहिती मा. मुख्य अधिकारी औ. म. यांनी मंडळास दिली. व मंडळाच्या १०१ व्या बैठकीत ठरल्याप्रमाणे मंडळाच्या रक्षणासाठी खाजगी शासन मान्य सेक्युरिटी सर्व्हीसेसकडून जाहिरात देऊननिविदा मागविण्यासाठी जाहिरात दिली. विहित मुदतीत २ निविदा विकल्या व

फक्त १ मोहरबंद निविदा भरुन प्राप्त झाली. सदर निविदा ही मे. मेडोएटर्स ॲण्ड सेक्युरिटी प्रा. लि. यांचेकडून रु. ६३००/- याच दराची निविदा प्राप्त झालेली आहे.

मा. मुख्य अधिकारी/औरंगाबादमंडळ यांनी प्रतिपादन केले की, सदर संस्था ही गेल्या ३ वर्षापासून मंडळाच्या कार्यालयाचे रक्षणकरित आहे व मे. मेडिएटर्स व अजिंठा सेक्युरिटी सर्व्हीसेस ही संस्था एक नामवंत संस्था असून शासकीय व निमशासकीय व खाजगी क्षेत्रात सेक्युरिटीची सेवा दिलेली आहे व आजही देत आहे. सदर संस्थेची निविदा दरमहा रु. ६३००/- ह्या दरात एक वर्षाच्या कालावधीसाठी सदर संस्थेची निविदा स्वीकारण्यात यावी

या मंडळाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले की, एक वर्षाच्या कालावधीसाठी ७. ११. ९६ ते ७. १०. ९७ पर्यन्तच्या कालावधीसाठी दरमहा रु. ६३००/- या दराने करार करण्यांत यावा.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

<u>ठराव क्रमांक ६१६</u>

मे. मेडिएटर्स ॲन्ड अजिंठा सेक्युरिटी सर्व्हीसेस या संस्थेकडून मंडळाच्या इमारतीच्या रक्षणासाठी प्राप्त झालेली निविदा रु. ६३००/- दरमहा या दराने ७. ११. ९६ ते ७. १०. ९७ या एक वर्षाच्या कालावधीसाठी मान्य करण्यांत येत आहे व सदर संस्थेबरोबर योग्य तो **करार** करण्यास मंडळ मान्यता देत आहे.

तसेच मंडळाच्या १०१ च्या बैठकीत ठरल्याप्रमाणे कंत्राटी पध्दतीवर एकत्रीत वेतनावर काम करणाऱ्या लोकांमधून सेवा जेष्ठतेनुसार वॉचमन नेमण्याच्या प्रस्तावाचा पाठपुरावा करावा व किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन देण्याविषयी प्राधिकरणाकडे पाठपुरावा करावा.

विषय क्र. ३: जालना नगरपरिषदेतील झोपडपट्टी सुधार कामाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

या विषयाची चर्चा करतांना मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जैन यांनी प्रतिपादन केले की, सन्माननीय सदस्यांनी पुर्वीची परिस्थिती लक्षात घेता झोपडपट्टी सुधार कामाची तपासणी करतांना जे काम झालेले आहे ते समाधानकारक नाही. शासन झोपडपट्टी सुधार कामासाठी पैसे उपलब्ध करुन देते व त्याचा योग्य गरजु लोकांना लाभ मिळाला पाहिजे व काम समाधानकारक होईल याची काळजी घेणे जरुरीचे आहे. त्यासाठी स्थानिक मंडळाच्या

सदस्यांकडून कामाची पाहणी झाल्याशिवाय व तसे प्रमाणपत्र घेतल्याशिवाय झोपडपट्टी सुधार कामाचे देयक अदा करू नये असे ठरले असतांना सुध्दा त्याची मंडळाच्या अधिकाऱ्याकडून दखल घेतली गेली नाही असे श्री. जैन यांनी सांगितले यावर मंडळाचे संबंधीत उपअभियंता श्री. पांडे यांनी योग्य तो खुलासा केला. तांत्रिक मान्यतेच्या प्रत्येक ॲटमनुसार तपासणी झाल्यास झोपडपट्टी सुधार कामे चांगल्या प्रकारे व चांगल्या प्रतीचें होतील असे सुचीत केले.

प्रा. श्री. नंदु कुलकर्णी सदस्य औरंगाबाद मंडळ यांनी श्री. जैन यांच्या प्रमाणेच भावना व्यक्त केल्यात. नांदेड नगरपरिषदेची आजपर्यन्त झोपडपट्टी सुधारणेची जी कामे झालेली आहेत ती चांगल्या प्रकारची झालेली नाहीत असें प्रतिपादन केले. तसेंच झोपडपट्टी सुधार कामाची देयके अदा करतांना तांत्रिक मान्यतेच्या अंदाजपत्रकातील ॲटमनुसार सर्व बाबींची तपासणी करुन व स्थानिक सदस्यांनी सदर कामाची पाहणी केल्याशिवाय व सदस्यांच्यां अभिप्रायाशिवाय झोपडपट्टी सुधार कामाची देयके अदा करु नये असे सुचीत केले.

मंडळाच्या सदस्या श्रीमती साने यांनी प्रतिपादन केले की, परभणी येथे जी झोपडपट्टी सुधारणेची कामे झालेली आहेत ती उत्कृष्ठ दर्जाचीं झालेली आहेत व झोपडपट्टी सुधारणेच्या कामावर नगरपरिषद सदस्य यां नात्याने मी स्वत: लक्ष ठेवत असते व काम निकृष्ठ दंर्जाचे होणार नाही याची काळजी घेण्यांत येते.

मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले की, झोपडपट्टी सुधार कामासाठी प्रति माणसी रु. ५००/- प्रमाणे मंजूरी देण्यांत येत होती. नुकतीच शासनाने रु. ८००/-दरडोई प्रमाणे अंदाजपत्रकास मान्यता देण्यासंबंधीचे शासनाने निर्णय घेतला आहे. परंतु सुविधानिहाय विभागणी केलेला सविस्तर तपशील प्राप्तं झालेला नाही.

जालना येथील मियासाहाब दर्गा व कैकाडी मोहल्ला या दोन झोपडपट्टयांचा प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेसाठी नगर परिषद जालनाने पाठविलेला आहे. मियॉसाहाब दर्गा झोपडपट्टीचे अंदाजपत्रक रु. १३, ३१, ९२६ असुन नियमानुसार त्यास रक्कम रुपये १०, २०, ५००/- ची प्रशासकीय मान्यता प्रदान करता येणे शक्य आहे. तसेच कैकाडी मोहल्ला या झोपडपट्टीचे अंदाजपत्रक रु. १३, २१, ९१३/- चे असुन नियमानुसार त्यास रु. ९, ६३, ६७८/- ची प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे. नगर परिषदेकडे सद्यस्थितीत

रु. ६.५० लक्षाची कामे प्रगतीपथावर आहेत सन १९९६.९७ ची मंजूर तरतुद रु. ४.०० लक्ष व पुढील वर्षी सन १९९७.९८ ची प्रस्तावीत तरतुद रु.८.०० लक्ष खर्च होण्याचे दृष्टीने व भविष्यात नगरपरिषदेच्या हाती कामे असण्यास्तव वरील झोपडपट्टी सुधार कामास प्रशासकीय मान्यता देता येणे शक्य आहे.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६१७

जालना नगरपालिकेने मियाँसाहाब दर्गा व कैकाडी मोहल्ला या झोपडपट्टीचे अंदाजपत्रक रु.५००/- दरडोई या मानकाप्रमाणे सादर केले आहे. तथापी शासनाचे सुधारीत दरडोई रु.८००/- आदेश लक्षात घेऊन संदर्भीय झोपडपट्ट्यांच्या कामांना दरडोई रु.८००/- प्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे व तांत्रिक मान्यतेसाठी जालना नगर परिषदेने सुधारीत अंदाजपत्रक त्वरीत सादर करावे. या ठरावाची स्थायी करण्याची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

विषय क्र. ४: झोपडपट्टी सुधारणा कार्यक्रम सन १९९६.९७ अंतर्गत परभणी शहरास मंजूर असलेली तरतुद रु. २५६.३९ लक्ष तरतुदीस अनुसरून परभणी नगरपरिषदेच्या झोपडपट्टी सुधारणा कामांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करणेबाबत.

परभणी शहरासाठी झोपडपट्टी सुधारणा योजने अंतर्गत १९९६.९७ या वर्षाकरिता रु.२५६.३९ लक्ष तरतुद विशेष घटक योजने अंतर्गत केलेली आहे. परभणी नगरपरिषदेच्या ऑगस्ट ९६ अखेरचा खर्च रु. ११.५१लक्ष आहे व नगरपरिषदेच्या हाती सद्यस्थितीत रु.१५.९२ लक्षाची कामे आहेत. वरील तरतुद खर्च करण्यास्तव परभणी नगरपरिषदेने २५ झोपडपट्टीचे प्रस्ताव सुधारीत करुन कार्यालयात सादर केलेली आहेत. त्यापैकी २४ झोपडपट्टीचे प्रस्ताव कार्यालयास तपासणीअंती मंडळासमोर ठेवण्यात येत आहेत. या २४ झोपडपट्ट्यांचे सुधारणा कामांना प्रशासकीय मान्यता दरडोई रु.८००/- प्रमाणे मान्यता देण्याचा आग्रह मा. सदस्या श्रीमती उषा साने यांनी धरला[शासनाने नुकतीच दरडोई ८००/- प्रमाणे मान्यता देण्याचा निर्णय घेतलेला आहे]

परंतु या २४ झोपडपट्टयांचे सुधारणा कामाचे अंदाजपत्रक मात्र रु.५००/- प्रमाणेच सादर करण्यांत आलेले आहेत.

यावर सांगोपांग चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६१८

१] नगरपरिषद परभणी यांच्याकडून प्राप्त झालेल्या २४ झोपडपट्टया सुधार कामास दरडोई रु.८००/- प्रमाणे प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यांत येत आहे. तथापी, तांत्रिक मान्यतेकरिता नगरपरिषद परभणी यांनी दरडोई रु. ८००/- प्रमाणे सुधारीत अंदाजपत्रके तयार करावीत.

२] तसेच परभणी नगरपरिषदेच्या उर्वरीत २० झोपडपट्टीचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्रा अभावी मंडळाच्या बैठकीत निर्णयास्तव ठेवण्यात आलेले नाहीत अशा अंदाजपत्रकास सुध्दा जिल्हाधिकारी यांचे प्रमाणपत्र नगरपरिषद परभणी यांनी उपलब्ध करुन दिल्यानंतर अशा २० झोपडपट्टीच्या अंदाजपत्रकास रु.८००/- दरडोई प्रमाणे प्रशासकीय मान्यतेचे आदेश मा. सभापती व सदस्य श्री. आसाराम तळेकर यांचे सहमती नंतरच निर्गमीत करण्यांत यावे.

वरील ठरावाची स्थायी करण्याची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करण्यांत यावी.

आयत्या वेळचा विषय

विषय क्र. १: औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे प्राप्त झोपडपट्टी सुधार कामांना लोकसंख्या वाढीनुसार सुधारीत प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

औरंगाबाद महानगरपालिकेने एकुण १६ झोपडपट्टीचा वाढीव लोकसंख्येस सुविधा पुरविण्याचे प्रस्ताव सुधारीत प्रशासकीय मान्यता मिळण्यास्तव सादर केले आहेत. शासनाच्या दि. २५ ऑक्टो. १९९१ च्या परिपत्रकानुसार व मुख्य अभियंता यांचे पत्र क्र. ३०६५ दि. १६.१२.९५स अनुसरुन वाढीव लोकसंख्येस अधिकच्या सुविधा पुरविता येऊ शकतात असे मा. मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले.

औरंगाबाद शहरास सन १९९६-९७ साठी एकुण रु.७९.०० लक्षाची तरतुद असुन ती आजपर्यन्त पूर्णपणे तरतुदी शिल्लक आहे. औरंगाबाद महानगरपालिकेकडे सद्यस्थिती अंदाजीत रु.१५.३६ लक्षाची कामे आहेत. महानगरपालिका

औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या एकुण १६ झोपडपट्टीच्या वाढीव लोकसंख्येस रु. ५००/- दरडोई प्रमाणे रु. २,१६,३१,२२६/- ची प्रशासकीय मान्यतेसाठी प्रस्ताव मंडळाच्या मान्यतेस्तव सादर केला असल्याचे मुख्य अधिकारी/औरंगाबाद मंडळ यांनी प्रतिपादन केले.

या विषयावर सविस्तर चर्चा होऊन मंडळाने असा निर्णय घेतला की,

ठराव क्र. ६१९
-------------

औरंगाबाद महानगरपालिकेने वाढीव लोकसंख्येनुसार सादर केलेल्या झोपडपट्टीच्या सुधार कामाच्या प्रस्तावास सुधारीत प्रशासकीय मान्यता खालील अटीवर देण्यात येत आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेने सादर केलेल्या १६ झोपडपट्टीच्या सुधारणा कामासही रु. ८००/- प्रतिडोई प्रमाणे सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास मंडळाची मान्यता देण्यात येत आहे. तथापी महानगरपालिका औरंगाबाद यांनी रु. ८००/- प्रतिडोई प्रमाणे अंदाजपत्रक सुधारीत करुन देणे आवश्यक आहे. तदनंतरच सुधारीत प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमीत करण्यात यावे. याही ठरावास स्थायी करण्याची वाट न बघता पुढील कार्यवाही करण्यात यावी.

पटलावरील विषय संपल्यानंतर मंडळाचे सन्माननीय सदस्य श्री. तळेकर यांनी बैठकीचा समारोप केला. आपल्या भाषणात मा. सदस्य श्री. तळेकर यांनी अपेक्षा व्यक्त केली की, अधिकाऱ्यांनी कार्यक्षमपणे काम करावे व मंडळाच्या समोर पुन्हा पुन्हा तेच विषय चर्चेसाठी येणार नाहीत याची काळजी घ्यावी.

मुख्य अधिकारी औरंगाबाद मंडळ यांनी सर्वांचे आभार मानले. राष्ट्रगीत होऊन उपस्थित पदाधिकाऱ्यांचे आभार मानून राष्ट्रगीतानंतर मा. सभापतीचे परवानगीने बैठक संपल्याचे जाहीर केले.

....